MHSN150015812020

( विनायकराव गणपती सुर्यवंशी–१ विरुध्द विकास गणपती सुर्यवंशी–इतर )

---

( CNR No.:-MHSN15-001581-2020 )

## विशेष दिवाणी दावा क्रमांक १३१/२०२० मधील निशाणी ५७ खालील आदेश

{जुना विशेष दिवाणी दावा क्रमांक १५/२०१८}

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रमांक ८ तर्फे प्रस्तुत प्रकरण कामी प्रस्तुत प्रतिवादी विरुध्द "एकतर्फा" व "विना कैफियत" सुनावणीबाबत पारीत झालेला आदेश रद्द होऊन, कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेणेबाबत केला आहे.

२. प्रतिवादी क्रमांक ८ याचे अर्जात असे कथन आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादीं विरुध्द वाटप व कब्ज्याकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणकामी प्रतिवादी क्रमांक ८ चि. वरदराज अजय सुर्यवंशी यास अ.पा.क. म्हणून त्याचे वडील प्रतिवादी क्रमांक ३ अजय गणपती सुर्यवंशी याचे वतीने प्रकरणाची नोटीस झालेली आहे. प्रस्तुत दाव्याचे नोटीस प्राप्त झालेनंतर विहीत मुदतीत कैफियत दाखल करणेची असते व कैफियत मुदतीत दाखल न केलेस कैफियत नाही असा आदेश पारीत केला जाऊ शकतो याबाबत प्रतिवादी क्रमांक ८ पूर्णतः अज्ञान होता. प्रस्तुत प्रकरणामध्ये कैफियत दाखल करण्याच्या अनुषंघाने आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करता आली नाहीत व त्यामुळे कैफियत तयार करणेकरीता वकीलांची भेट घेणे शक्य नाही. प्रतिवादी क्रमांक ८ याने जाणुनबुजून कैफियत दाखल करणेस विलंब केलेला नाही. प्रतिवादी क्रमांक ३

सध्या नोकरी निमित्त औरंगाबाद येथे इंजिनिअर म्हणून कार्यरत आहे. प्रतिवादी क्रमांक ८ यास नोटीसची बजावणी झालेनंतर प्रतिवादी क्रमांक ३ यास कार्यालयातून रजा न मिळाल्याने मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ८ विरुध्द "एकतर्फा" व "विना कैफियत" सुनावणीबाबत झालेला आदेश रद्द होऊन कैफियत अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्रमांक ८ याची कैफियत अभिलेखावर आल्यास वादी अथवा अन्य प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसार होणार नाही. याउलट, प्रतिवादी क्रमांक ८ याचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्रमांक ८ याने अर्ज मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदवला आहे. वादी यांचे असे म्हणणे आहे की, अर्ज जास्तीत जास्त खर्चाची रक्कम आकारणेचे अटीवर मंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. प्रकरणाचे अभिलेख पाहिले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणाचे अभिलेखाचे अवलोकन करता असे स्पष्ट होते की, दिनांक १६/०१/२०१८ रोजी वादी यांनी प्रस्तुत प्रकरण प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांचे विरुध्द वाटप व कब्जाकरीता दाखल केले होते. तदनंतर, प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी दिनांक २३/०८/२०१८ रोजी निशाणी २५ अन्वये त्यांचेतर्फे प्रस्तुत प्रकरणकामी कैफियत दाखल केली आहे. तदनंतर, दिनांक १३/०२/२०१९ रोजी माझे पूर्वाधिकारी यांनी निशाणी २६ अन्वये प्रस्तुत प्रकरणामध्ये मुद्येची मांडणी केली.

तदनंतर, वादींतर्फे वटमुखत्यार उर्मिलादेवी विनायकराव सुर्यवंशी हिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी २८ अन्वये दाखल केले होते. परंतु, दरम्यानच्या कालावधीमध्ये घडलेल्या प्रमुख घडामोडींच्या अनुषंगाने दिनांक ११/०२/२०२० रोजी निशाणी ४१ अन्वये प्रस्तुत प्रकरणकामी प्रतिवादी क्रमांक ६ ते ८ यांना प्रतिवादी म्हणून दाव्यामध्ये सामील करणेबाबत अर्ज सादर केला. सदरचा निशाणी ४१ वरील अर्ज दिनांक ०९/०३/२०२० रोजी मंजूर करण्यात आला. दिनांक १३/०३/२०२० रोजी वादी यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये आवश्यक दुरुस्ती केली व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल केली. तदनंतर, कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे टाळेबंदी जाहीर करण्यात आली होती व सदर टाळेबंदीमुळे न्यायालयीन कामकाज ऑगस्ट–२०२१ महिना अखेरपर्यंत अंशतः चालू होते. दरम्यानच्या कालावधीमध्ये दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर या न्यायालयाची विटा येथे स्थापना झाल्यानंतर प्रस्तुत प्रकरण या न्यायालयाकडे वर्ग करण्यात आले. प्रस्तुत दावा विटा न्यायालय येथे वर्ग झालेबाबत प्रतिवादी क्रमांक ८ यास निशाणी ५० अन्वये नोटीस पाठविण्यात आली. दिनांक २७/११/२०२१ रोजी प्रतिवादी क्रमांक ८ करीता प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्रमांक २ विजय गणपती सुर्यवंशी यांनी नोटीस स्वीकारलेली आहे. परंतु, दिनांक २१/०३/२०२२ अखेरपर्यंत प्रतिवादी क्रमांक ८ प्रस्तुत प्रकरणकामी हजर न झाल्यामुळे त्याचे विरुध्द “एकतर्फा” सुनावणीचा आदेश पारीत करण्यात आला आहे. दिनांक ०२/०५/२०२२ रोजी प्रतिवादी क्रमांक ८ मार्फत प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्रमांक ८ तर्फे प्रस्तुत अर्जासोबत दाव्यास कैफियत दाखल केलेली आहे. दावा समन्स/नोटीस प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी क्रमांक ८ दाव्याकामी हजर राहीला नाही अथवा विहीत मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही.

६. उपरोक्त परिस्थितीचा विचार करता, प्रस्तुतचा दावा वाटप व कब्जाकरीता दाखल केलेला आहे. वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी त्यांची कैफियत दाखल केलेनंतर व निशाणी २६ वर मुद्देची मांडणी केल्यानंतर, वादींतर्फे वटमुखत्यार उर्मिलादेवी विनायकराव सुर्यवंशी हिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी २८ अन्वये अभिलेखावर दाखल केले आहे. परंतु, पुरावा नोंदविणेची सुरुवात झालेली नाही. तसेच, दरम्यानच्या कालावधीमध्ये घडलेल्या प्रमुख घडामोडींच्या अनुषंगाने वादी यांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्रमांक ६ ते ८ यांना सामील केले आहे. प्रस्तुत प्रकरणाचे समन्स प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी क्रमांक ८ प्रस्तुत दाव्याकामी हजर न राहील्याने त्याचे विरुध्द “एकतर्फा” सुनावणीबाबत आदेश पारीत झाला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ८ विरुध्द “एकतर्फा” सुनावणीचा झालेला आदेश रद्द होणे आवश्यक आहे.

७. त्याचप्रमाणे, प्रतिवादी क्रमांक ८ याने विहीत मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. परंतु, प्रतिवादी क्रमांक ८ विरुध्द “विना कैफियत” सुनावणीबाबत आदेश पारीत करण्यात आलेला नाही. परीणामी, प्रतिवादी क्रमांक ८ तर्फे कैफियत दाखल करणेसाठी झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे व प्रस्तुत प्रकरणाकामी बचाव उपस्थित करणेचे संधी उपलब्ध करुन देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे वादी व इतर प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. प्रतिवादी क्रमांक ८ तर्फे प्रस्तुत अर्जासोबत कैफियत दाखल केलेली आहे. तसेच, प्रस्तुत प्रकरणाची गुणदोषावर सुनावणी होऊन निर्णय होणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्रमांक ८ तर्फे सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला आहे. सदर विलंबापोटी प्रतिवादी क्रमांक ८ याचे कडून खर्च आकारण्यात येऊन सदर खर्चाची रक्कम वादी यांना देणे उचित होईल.

सबब, उपरोक्त सर्व विवेचनांचा विचार करता प्रस्तुत अर्ज मंजूर करणे उचित होईल.

सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज र.रु.३००/- (तीनशे रुपये मात्र) खर्च आकारण्यात येऊन मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरण कामी प्रतिवादी क्रमांक ८ विरुध्द "एकतर्फा" सुनावणीबाबत झालेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्रमांक ८ तर्फे प्रस्तुत प्रकरणाकामी कैफियत दाखल करणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

४. प्रतिवादी क्रमांक ८ याची कैफियत अभिलेखावर दाखल करण्यात येते.

५. प्रतिवादी क्रमांक ८ याने पुढील तारीख अथवा तत्पूर्वी वादी यांना खर्चाची रक्कम अदा करावी.

SUDHIR NARHARIRAO SHINDE

Digitally signed by SUDHIR NARHARIRAO SHINDE
Date: 2022.07.19 15:09:05 +0530

विटा. (सुधीर न. शिंदे)
दिनांकः- १८/०७/२०२२. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, विटा.

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : S. P. Pethkar.
Court : Jt. Civil Judge Senior Division, Vita.
Judgment/Order signed by the Presiding Officer on : 18/07/2022.
Judgment/Order uploaded on : 20/07/2022.